दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.२८ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १२४ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 28 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 124 | Pages 4 | Rate 4 Rs

## सुधीर मुनगंटीवार नाराज नाहीत

**मुंबई**–बावनकुळे म्हणाले, सुधीर मुनगंटीवार पक्षावर नाराज नाहीत. शांत आहेत. आम्ही सर्वजण शांतपणे बसलो आहोत. मुनगंटीवार यांच्याविषयी चुकीचा गैरसमज निर्माण केला जात आहे. कारण नसताना असे केले जात आहे. ना त्यांच्या मनात तसे काही आहे, ना आमच्या मनात तसे काही आहे. मुनगंटीवर आमचे नेते आहेत. राज्याचे महत्त्वाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात आम्ही चंद्रपूर व विदर्भातील महापालिका लढवत आहोत. स्थानिक पातळीवर पक्षप्रवेश होताना काही जुने कार्यकर्ते नाराज होतात. पण भाजपचा डीएनए असा आहे की, कुणी भाजपमध्ये नवे आले तर पक्ष त्याला सांभाळून घेतो.

# ही भूक कधीही न संपणारी-आम्ही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला

## इच्छुक उमेदवारांना नितीन गडकरींचा टोला



### ही भूक कधीही न संपणारी

एक महिला माझ्याकडे आली आणि मला एकदा नगरसेवक बनवा अशी इच्छा व्यक्त केली. आम्ही तिला नगरसेवक बनवले. मात्र महापौर बनवू शकलो नाही. त्यामुळे ती खूप रडू लागली. तिचे रडणे पाहून माझ्या आईने विचारले, हिच्या नवऱ्याचा मृत्यू झाला का? मी आईला सांगितले, नाही, हिला तिकीट मिळाले नाही म्हणून रडत आहे. नंतर तिला महापौर बनवले. त्यानंतर तिने आमदार होण्याची इच्छा व्यक्त केली. आणि आता ती नगरसेवकाच्या तिकीटा साठी तयार आहे, असे सांगत गडकरी म्हणाले की ही भूक कधीही न संपणारी आहे. महत्वाकांक्षा असणे स्वाभाविक आहे. कार्यकर्त्यांमध्ये आशा, अपेक्षा आणि आकांक्षा असणे चुकीचे नाही.

### आधी काम करा, अन्यथा तिकीट मागू नका

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, नगरसेवक बनायचे झाले तर आधी काम करा, अन्यथा तिकीट मागू नका. मला एका ठिकाणी समजले की नवरा, बायको, मुलगा आणि बहीण अशा चौघांनीही तिकीट मागितले होते. तेव्हा मी मस्करीत म्हणालो, अजून दोन जण उरलेत, ड्रायव्हर आणि चमच्यालाही तिकीट मागायचे राहिले की काय? असा टोला गडकारींनी भाषणात लगावला.कोणी कुठे जन्म घेतला, हा गुन्हा नाही. मात्र, स्वतःच्या पत्नीला तिकीट मिळावे म्हणून आग्रह धरण्यापेक्षा, लोकांनीच 'यांना तिकीट द्या असे सांगावे, अशी परिस्थिती निर्माण होणे अधिक योग्य आणि लोकशाहीला साजेसे आहे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्म शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमात नितीन गडकरी बोलत होते.

**नागपूर | प्रतिनिधी**

आपल्या परखड मतांमुळे आणि सर्वांनाच धारेवर धरणारे नेते म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ओळखले जाते. आता त्यांनी पुन्हा एकदा असेच वक्तव्य केले आहे. सध्या महाराष्ट्रात महापालिका निवडणुकीचे वातावरण सुरू असून इच्छुक उमेदवारांची गर्दी देखील वाढली आहे. यावर गडकारींनी त्यांच्या मिश्किल शैलीत वक्तव्य केले आहे. आजकाल पक्षांची आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु, आम्ही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला असल्याचे वक्तव्य त्यांनी केले आहे. तसेच उमेदवारी मिळवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर बोलताना गडकरी म्हणाले, ही कधीही न संपणारी भूक.दादा कोंडके यांच्या चित्रपटाचा दाखला देत नितीन गडकरी म्हणाले, गर्दीतील प्रत्येक व्यक्तीला वाटत असते की आपल्यालाच तिकीट मिळावे. मात्र जनता आता तितकीच हुशार झाली आहे. आजकाल पक्षाची आर्थिक स्थिती खूप चांगली आहे.परंतू आम्हीही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला आहे.पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, एकदा मला एक व्यक्ती भेटली. त्याने चहा आणि जिलेबी खाऊ घातली, पण 'माझे काय होणार?' असा प्रश्न ती व्यक्ती विचारत होता. मी त्याला म्हणालो, तू खाऊ घाल, सर्व ठीक होईल. मात्र, त्यावेळी आमच्या हातात काहीच नव्हते. तरीही तिकीट देणारे आम्ही नाहीत, हे त्यांना माहीत नव्हते. आजही अनेक लोक ताणून बसले आहेत. लोकांना वाटते की नितीनजी किंवा देवेंद्रजी सांगतील तर तिकीट मिळेल, असे वाटणे स्वाभाविक आहे, असेही गडकरी यावेळी म्हणाले.

# प्लास्टिकमुक्तीचा नारा बोरफडीचा कायापालट करणार-किशोर काळे

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत गावकऱ्यांचा ठाम संकल्प

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत प्लास्टिकमुक्ती अभियान उत्साहात राबविण्यात आले. यावेळी प्लास्टिकमुक्तीचा नारा बोरफडी गावचा कायापालट घडवून आणेल, असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी केले.

सरपंच कैलास घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला बचत गट, युवक, शालेय विद्यार्थी व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरण, पशुधन व मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी विस्तार अधिकारी अरुण मोरे, जिल्हा प्रशिक्षण समन्वक अशोक खरसाडे, युवा उद्योजक सुनील कुटे, गोरख घुगे,वचिष्ठ कुटे, रामभाऊ गाडे, सिध्देश्वर घुगे, बिभीषण घुगे, जयवंत ठोंबरे, कृष्णा घुगे, कृषी सहायक खामकर, ग्रामपंचायत अधिकारी विवेक गिते यांच्यासह मान्यवर व्यक्ती व गावकऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

यावेळी गावातील रस्ते, शाळा परिसर, सार्वजनिक ठिकाणे व नाले परिसरात स्वच्छता मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यात आले. संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत प्रशासनाच्या मार्गदर्शक




सूचनांची माहिती देण्यात आली.


तसेच नागरिकांनी एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळून कापडी व पर्यावरणपूरक साहित्य वापरण्याचा संकल्प केला. स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी गाव निर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभाग घ्यावा, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी केले.

सरपंच कैलास घुगे यांनी गाव कायमस्वरूपी प्लास्टिकमुक्त ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत जनजागृती, दंडात्मक कारवाई व पर्यायी साधनांच्या वापरावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत, प्रशासन व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग बीड जिल्ह्यातूनच करावा-खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

लातूर-कल्याण (जनकल्याण द्रुतगती) प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गाचा मूळ मार्ग हा बीड जिल्ह्यातूनच जावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी २७ डिसेंबर रोजी मुख्यमंत्र्याना लेखी पत्र सादर केले आहे.पत्रात खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे, प्रस्तावित लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग हा बीड जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून या महामार्गामुळे जिल्ह्याच्या औद्योगिक, शेतीपूरक व आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. तसेच या महामार्गाच्या माध्यमातून दळणवळण अधिक सुलभ होऊन व्यापार, उद्योग आणि रोजगारनिर्मितीसाठी मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. सध्या सदर महामार्गाचा मार्ग धाराशिव जिल्ह्याकडे वळविण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे निदर्शनास आणून देत, असे झाल्यास बीड जिल्ह्यावर अन्याय होईल आणि जनतेत तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे शासनाने मूळ प्रस्ताव आणि नियोजनानुसारच लातूर-अंबाजोगाई-केज-बीड-जामखेड-अहिल्यानगर या मार्गानेच हा राष्ट्रीय महामार्ग विकसित करावा, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली आहे. बीड जिल्हा हा मागास भाग म्हणून ओळखला जात असून अशा महत्त्वाच्या पायाभूत सुविधेमुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा होईल, असेही खा.सोनवणे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे शासनाने जनहिताचा विचार करून लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्गाचा मूळ मार्ग बीड जिल्ह्यातूनच अंतिम करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग हा बीड जिल्ह्यातूनच प्रस्तावित आहे, असे असताना काही मंडळी यात खोडा आणू पहात आहेत. मुळ प्रस्तावित मार्ग बदलल्यास बीड जिल्ह्याच्या विकासाला ब्रेक लागेल. यामुळे सदरील मार्गात बदल नकोच, असेही म्हटले आहे.



# ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांचा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे | प्रतिनिधी**

अडीच वर्ष महाराष्ट्रात जातीयवादाचा वणवा पेटलेला असताना तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तो कुशलतेने हाताळला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून हजारो रुग्णांना रोगमुक्त करण्याचे काम शिंदे यांनी कोणताही गाजावाजा न करता शांततेत केले. हा त्यांचा मोठेपणा आहे. शिंदे यांनी केलेलं काम लोक विसरणार नाहीत, अशा शब्दांत ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांनी शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री शिंदे यांचे कौतुक केले. हिंदुत्वाविषयी जागरुक असलेले शिंदे कडवे हिंदुत्ववादी नेते आहेत, असे महाजन म्हणाले. ठाणे येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत महाजन यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला.

महाजन पुढे म्हणाले की, हिंदुत्वावर काम करण्याची इच्छा असल्याने आज शिवसेनेत



प्रवेश केला. महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री झाले जे घरात बसून राहिले, परीक्षेला बसले नाहीत पण पहिले आले, मात्र एकनाथ शिंदे याला अपवाद ठरले. ते परीक्षेला पण बसले आणि पहिले आले, अशा शब्दांत महाजन यांनी शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाचे कौतुक केले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून बरे झालेल्या रुग्णांनी शिंदे यांना आभार पत्र पाठवली, त्या पत्रांच वजन १०० किलो आहे, असं दृश्य आजवर कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला दाखवलं नाही. मात्र याचा कुठेही शिंदे यांनी गाजावाजा केला नाही हा त्यांचा मोठेपणा आहे,

## वादळी कट्टा

### बालमजूर

कोवळे हात, स्वप्न अजूनही डोळ्यांत दाटलेले
खांद्यावर ओझे मात्र, आयुष्यभराचे वाटलेले
शाळेची घंटा दूर कुठेतरी, हाक देत रडत राहते
पुस्तकाऐजी विटा-भांडी, छोटंसं बालपण हरपून जाते
आई-बाबांचे हक्काचे हास्य, गरिबीने हिरावून घेतले
खेळण्यांची दुनिया सोडून, जगण्याचे धडे त्याने शिकले
थेंब थेंब घामात मिसळती, न ऐकलेल्या गोष्टी हजार
प्रश्न एकच- का व्हावा लागतो, लहान वयात मजूर आपला बाल?
उद्या उजाडो उजळ सूर्य, बंद होवो ही अन्यायाची रीत
प्रत्येक हातात पुस्तक फुलो, आणि हसू दे बालपण पुन्हा नित

# महात्मा फुले युवा दला तर्फे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा बीड येथे भव्य सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार (जयभाऊ) गोरे यांचा महात्मा फुले युवा दलाच्या वतीने बीड येथे भव्यसत्कार करण्यात आला.दि.३ जानेवारी २०२६ रोजी नायगाव येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव सोहळ्याच्या तसेच १४३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले स्मारकाच्या भूमिपूजन समारंभाच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यासाठी मंत्री जयकुमार गोरे बीड येथे आले होते.यावेळी बोलताना मंत्री जयकुमार गोरे यांनी नायगाव येथे होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमास महाराष्ट्रातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन केले.महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ड.सतीश शिंदे यांनी महाराष्ट्रभरातील महात्मा फुले युवा दलाचे सर्व कार्यकर्ते या कार्यक्रमा साठी उपस्थित राहतील असा शब्द जयकुमार गोरे यांना दिला.या सत्कार प्रसंगी ड.सतीश शिंदे, ड.राजेंद्र राऊत,महात्मा फुले युवा दल बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे, पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर, सुलतानपूरचे सरपंच धनेश्वर खेत्रे,प्रदीप अण्णा गायकवाड,सचिन दुधाळ, मयूर आखाडे,धर्मराज दुधाळ,रमेश दुधाळ,संकेत गिरी,सुळ रमेश,सुधीर शिंदे,सुरेश राऊत यांच्या सह महात्मा फुले युवा दवाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



संपादकीय

# शत्रुत्वाची भावना

बांगलादेशमधील अराजकता आणि सतत वाढणाऱ्या हिंसाचारामुळे तिथल्या हिंदू अल्पसंख्याक समुदायाचे जीवन संकटात सापडले आहे. गेल्या आठवड्यातील एका घटनेचे पडसाद भारतातही उमटले. बांगलादेशातील मैमनसिंग जिल्ह्यातील भालुका येथे घडलेली ही घटना. दीपूचंद्र दास नावाच्या हिंदू तरुणाची जमावाने क्रूरपणे हत्या केली. मृत्यूनंतर त्याचा मृतदेह झाडाला लटकवून जाळून टाकण्यात आला. या घडलेल्या घटनेनंतर भारतातील हिंदूमध्येही संतापाची लाट पसरली. मुंबई, दिल्लीसह देशातील अनेक भागांत बांगलादेश सरकारविरोधात निदर्शने झाली. पण, हे कधी थांबेल? या आशेवर बांगलादेशातील अल्पसंख्याक समाज जीव मुठीत घेऊन जगत आहे. अलीकडेच ढाका येथे शेख हसीना गटाचे कट्टर विरोधक 'इन्किलाब मंच'चे नेते शरीफ उस्मान हादी यांची अज्ञात लोकांनी हत्या केल्यानंतर भीषण हिंसाचार उसळला. या हिंसाचारात हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांना लक्ष्य केले गेले. लुटमार, त्यांच्या घरांची जाळपोळ आणि त्यांच्यावर सामूहिक अत्याचाराच्या घटनेमुळे हिंदू समाज भयभीत झाला. तसे पाहू गेल्यास बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांची जी आकडेवारी समोर आली, ती तिथल्या अल्पसंख्याक समाजाची चिंता वाढवणारी आहे. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत अल्पसंख्याक; विशेषत: हिंदू महिलांवरील बलात्काराचे ३४२ गुन्हे नोंदवले गेले. मैमनसिंगमधील दीपू दास याच्या घृणास्पद हत्येच्या घटनेनंतर भारत सरकारने गंभीर दखल घेत बांगलादेश सरकारला सुनावले. रणधीर जयस्वाल यांनी एका धक्कादायक आकडेवारीचा दाखला दिला. बांगलादेशातील अंतरिम सरकारच्या कार्यकाळात हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचाराच्या तब्बल तीन हजारांहून अधिक घटनांची नोंद झाली, असे जयस्वाल यांनी सांगितले. बांगलादेशात अल्पसंख्याकांविरुद्ध पसरलेली शत्रुत्वाची भावना आणि हिंसाचार हा केवळ चिंतेचा विषय नसून तो गंभीर आंतरराष्ट्रीय प्रश्न बनत चालला आहे, हे यावरून दिसून येते.बांगलादेशाच्या निर्मितीला भारत कारणीभूत असल्याने गेल्या ५० वर्षांपासून भारताचे बांगलादेशसोबत मैत्रीचे संबंध होते. भारताला पूरक असलेली शेख हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी बांगलादेशातील आंदोलकांना चीनकडून छुप्या पद्धतीने रसद पुरवली गेली होती, याचे पुरावे आता समोर येत आहेत. त्यामुळे, विद्यमान सरकारच्या पदराआडून चीनच्या कुरघोड्या सुरू आहेत, हे उघड आहे. भारताबद्दल सहानुभूती बाळगणारा मोहम्मद युनूस यांच्यासारखा नेता सध्या बांगलादेशचा हंगामी पंतप्रधान आहे, असा समज सुरुवातीला होता. पण, शेख हसीना सरकारचे पतन झाल्यापासूनच दोन्ही देशांतील संबंधात कटुता येणे सुरू झाले होते. पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम यशस्वीरीत्या राबवली. परंतु, शेजारी असलेल्या बांगलादेशाने भारतासोबत व्यापार युद्ध सुरू केले. भारतात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर शुल्क लावण्याची घोषणा करून बांगलादेशानेच या व्यापार युद्धाची सुरुवात केली. भारताने त्याला प्रत्युत्तर म्हणून बांगलादेशात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर निर्यातशुल्क लावण्याची घोषणा केली. बांगलादेशाचे एवढ्यात समाधान झाले नाही म्हणून की काय, भारताशी झालेला १८० कोटींचा संरक्षण करार रद्द केला. त्यामुळे, बांगलादेशातील बहुसंख्याक मुस्लीम समाजाचाच नव्हे; तर सरकारचा भारतविरोधी द्वेष जगासमोर आला आहे.बांगलादेशच्या २०२२ च्या जनगणनेनुसार, बांगलादेशात हिंदू धर्मीय हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे धर्मीय आहेत. बांगलादेशातील ६४ पैकी ६१ जिल्ह्यांमध्ये हिंदू धर्मीय राहतात. बांगलादेशातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७.९५ टक्के लोक हिंदू आहेत. भारत आणि नेपाळनंतर बांगलादेशमध्ये जगातील तिसऱ्या क्रमांकाची हिंदू लोकसंख्या असल्याचे मानले जाते. बांगलादेशात पसरलेल्या अत्याचारांच्या सर्वाधिक बळी अल्पसंख्याक हिंदू महिला आहेत. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी बांगलादेशमध्ये सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. त्यापूर्वी, हिंदूसह धार्मिक अल्पसंख्याकांना जिवंत जाळण्यासारखे भयानक प्रकार वारंवार घडत आहेत, हा चिंतेचा विषय आहे. बांगलादेशातील ढासळलेली कायदा-सुव्यवस्था हेसुद्धा त्यातील एक कारण आहे. हसीना यांनी भारतात आश्रय घेतला असल्याचा राग म्हणून बांगलादेशातील हिंदूंना टार्गेट केले जात आहे का? या मुद्द्यावर मतांतरे असू शकतात; परंतु, हसीना यांच्याविरोधातील मुख्य राजकीय पक्ष बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे कार्यवाहक अध्यक्ष तारिक रहमान यांनी 'हिंदू-मुस्लीम करू नका, ते सगळे बांगलादेशचे नागरिक आहेत,' असे केलेले वक्तव्य आशादायक आहे. माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे रहमान हे ज्येष्ठ पुत्र असून १७ वर्षांनी लंडनहून मायदेशी परतले आहेत. 'हा देश डोंगराळ आणि मैदानी भागातील लोकांचा, मुस्लीम, हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांचा आहे. आम्हाला एक सुरक्षित बांगलादेश निर्माण करायचा आहे; जिथे प्रत्येक महिला, पुरुष आणि मूल घराबाहेर पडू शकेल आणि सुरक्षितपणे परत येऊ शकेल', असे रहमान यांचे बांगलादेशी नागरिकांना संबोधून केलेले भाषण चर्चेचा विषय ठरला आहे. बांगलादेशींच्या मनात भारताविरोधातील आणि हिंदू धर्मीयाविरोधातील शत्रुत्वाचा वाढलेला भाव ते कितीपत कमी करतात, हे येणाऱ्या काळात दिसून येईल. बांगलादेशातील हिंसाचाराच्या घटनांना केवळ माध्यमाची अतिशयोक्ती किंवा राजकीय हिंसा म्हणून दुर्लक्षित केले जाऊ शकत नाही, हे बांगलादेशाला पुन्हा ठणकावून सांगण्याची हीच वेळ आहे.

# काशीबाई निंगुळे यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील मांगवडगाव येथील जेष्ठ महिला काशीबाई पांडुरंग निंगुळे वय ७१ वर्ष यांचे शनिवार हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शनिवार रोजी शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात मुलगा सून नातवंडे असा परिवार आहे.कष्टाळू मनमिळाऊ स्वभाच्या ताई म्हणून त्या सर्वपरिचित होत्या.प्रदीप निंगुळे,संदीप निंगुळे यांच्या त्या आजी होत.

# शहाद्यात दिव्यांग बांधवांसाठी विशेष आधार कार्ड अपडेट शिबिराचा धडाक्यात प्रारंभ!

## शासकीय योजनांचा लाभ मिळणे होणार अधिक सुलभ; जिल्हा प्रशासन व दिव्यांग महासंघाचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिव्यांग बांधवांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना आधार कार्डमधील त्रुटींमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही अडचण दूर करण्यासाठी राष्ट्रीय दिव्यांग विकास महासंघ (जिल्हा शाखा नंदुरबार) आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने शहादा येथे विशेष 'आधार कार्ड अद्ययावत शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शहादा येथील प्रकाशा रोडवरील नवीन भाजी मंडईजवळ सुरू आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये दिव्यांग व्यक्तींना खालील बदल करून घेता येणार आहेत: नाव आणि पत्त्यात दुरुस्ती मोबाईल क्रमांक अपडेट करणे बायोमेट्रिक माहिती (ठसे व डोळ्यांचे स्कॅनिंग) अद्ययावत करणे.



**दिव्यांग सक्षमीकरणासाठी आधार कार्ड अद्ययावत असणे ही पहिली पायरी आहे. या शिबिरामुळे बांधवांना रांगेत उभे न राहता सन्मानाने आपली कामे करून घेता येतील.**
**– राजाभाऊ कुवर (जिल्हा अध्यक्ष)**

# शहादा-दोंडाईचा रस्त्यावर भीषण अपघात; ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या चाकाखाली चिरडून महिलेचा मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा ते दोंडाईचा रस्त्यावर रिलायन्स पेट्रोल पंप परिसरात शुक्रवारी दुपारी एक भीषण अपघात घडला. एका दुचाकीने दिलेल्या हुलकावणीमुळे रस्तावर पडलेल्या महिलेच्या अंगावरून भरधाव ट्रॅक्टर गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे पती गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात दोन अज्ञात वाहन चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलोणी (ता. शहादा) येथील रहिवासी रविंद्र लोटन देसले आणि त्यांच्या पत्नी मालुबाई रविंद्र देसले (वय ३८) हे दोघे आपल्या दुचाकीने (क्र. एम एच ३९ ए ए सी झेड ६७६८) दोंडाईचाच्या दिशेने जात होते. दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास फॉरेस्ट ऑफिस ते रिलायन्स पेट्रोल पंपाच्या दरम्यान एका अज्ञात मोटारसायकल स्वाराने (क्र. एम एच ए ए २००९) देसले यांच्या दुचाकीला जोरदार हुलकावणी दिली. या हुलकावणीमुळे रविंद्र देसले यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी रस्त्यावर स्लिप झाली. यावेळी मागे बसलेल्या मालुबाई देसले या रस्त्यावर फेकल्या गेल्या. त्याच क्षणी पाठीमागून येणाऱ्या ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या (क्र. एम एच १९ सी झेड २५२४) चालकाने आपल्या ताब्यातील वाहन बेदरकारपणे चालवत रस्त्यावर पडलेल्या मालुबाई यांच्या अंगावरून नेले. या भीषण अपघातात मालुबाई यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

अपघातानंतर माणुसकी दाखवून जखमींना मदत करण्याऐवजी, दुचाकी चालक आणि ट्रॅक्टर चालक हे दोघेही अपघाताची माहिती न देता घटनास्थळावरून फरार झाले. या घटनेत रविंद्र देसले हे देखील जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी मयत महिलेचे मेहुणे भटु सिताराम सोनवणे यांच्या फिर्यादीवरून शहादा पोलिसांनी अज्ञात मोटारसायकल चालक आणि ट्रॅक्टर चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), २८१, १२५ (अ), १२५ (ब) आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र वावरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वाढत्या वेगामुळे आणि बेशिस्त चालकांमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

# नंदुरबारच्या कर्तबगार सरपंचाची झेप; संदीप वळवी यांना आंध्र प्रदेशात 'पेसा' मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय निमंत्रण

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी भागातील ग्रामविकासाचे मॉडेल आता देशपातळीवर पोहोचले आहे. दुर्गम भागातील कात्री (तालुका धडगाव) ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप वळवी यांनी ग्रामविकासात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल थेट केंद्रीय पंचायतराज मंत्रालयाने घेतली आहे. आंध्र प्रदेश येथील हुकुमपेठ विभाग मंडळातील मेट्यूजोरू ग्रामपंचायतीमध्ये 'पेसा दिना'निमित्त आयोजित विशेष ग्रामसभेत मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना निमंत्रित करण्यात आले होते.




पेसा कायद्यांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना जल, जमीन आणि जंगल यावर विशेष अधिकार देण्यात आले आहेत. विशेषतः गौण वनोत्पादनांच्या व्यवस्थापनात आणि विक्रीत ग्रामसभेची स्वायत्तता हा कळीचा मुद्दा आहे. या विषयावर संदीप वळवी यांनी आंध्र प्रदेशातील ग्रामस्थांना आणि लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन केले. नैसर्गिक संसाधनांचा वापर करून गावाला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी कसे बनवता येईल, याचा वस्तुपाठ त्यांनी यावेळी मांडला.

सरपंच संदीप वळवी यांनी आपल्या कार्यकाळात कात्री ग्रामपंचायतीमध्ये अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत, ज्यामुळे त्यांचे नाव राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आले:

सीताफळ प्रक्रिया, आंबाळी प्रक्रिया आणि मिलेट (तृणधान्य) प्रक्रिया केंद्रांच्या माध्यमातून स्थानिक रोजगाराला चालना दिली.

लोकसहभागातून गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विशेष मोहीम राबवली.

ग्रामस्थांना सोबत घेऊन मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून गावाला हिरवेगार केले.

केंद्रीय मंत्रालयाने संदीप वळवी यांच्या अनुभवाचा फायदा इतर राज्यांना व्हावा, या उद्देशाने ही संधी उपलब्ध करून दिली. एका आदिवासी भागातील सरपंचाने आपल्या कल्पकतेने आणि जिद्दीने ग्रामपंचायतीचा चेहरामोहरा बदलल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे महाराष्ट्रातील इतर ग्रामपंचायतींनाही प्रेरणा मिळाली आहे.

ग्रामसभेच्या अधिकारांचा वापर करून आम्ही कात्री गावाचा विकास साधला. तोच अनुभव आंध्र प्रदेशातील बांधवांसोबत शेअर करताना आनंद झाला. हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून संपूर्ण ग्रामस्थांच्या सहभागाचा आहे.

# भिजवलेल्या तांदळाचे आरोग्यदायी फायदे तुम्हाला माहिती आहेत का?

तांदूळ हे भारतीय खाद्यपदार्थातील मुख्य अन्न आहे. अनेकांना तर भाताशिवाय पोटही भरत नसते. आपल्या आहारात तांदूळ खूप महत्त्वाचा आहे, डोसापासून रात्रीच्या जेवणापर्यंत भात आवश्यक झाला आहे. तथापि, आजच्या काळात लोक जास्त घाईत आहेत आणि तांदूळ व्यवस्थित शिजवत नाहीत, ज्यामुळे तांदळाच्या फायद्याऐवजी शरीराचे नुकसान होऊ लागते. आपले पूर्वज स्वयंपाक करण्यापूर्वी काही काळ तांदूळ पाण्यात भिजत असत. ही केवळ चव किंवा सवयीची बाब नाही, तर हा एक स्वस्थ मार्ग आहे. आजच्या काळात अनेकांना तांदूळ धुण्याची आणि थेट शिजवण्याची घाई असते, परंतु तांदूळ पाण्यात भिजवण्यामागे अनेक गुणधर्म लपलेले असतात. भात भिजवून काय होते ते जाणून घेऊया.



भात खाणे हे केवळ भारतीय आहाराचा अविभाज्य भाग नसून ते आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. भातामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण भरपूर असते, जे शरीराला झटपट ऊर्जा पुरवण्याचे काम करते. विशेषतः शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांसाठी भात हा ऊर्जेचा मुख्य स्रोत आहे. तांदूळ हा नैसर्गिकरित्या 'ग्लूटेन-मुक्त' असतो, त्यामुळे ज्यांना गव्हाची किंवा ग्लूटेनची लर्जी आहे, त्यांच्यासाठी भात हा एक सुरक्षित आणि उत्तम पर्याय ठरतो. आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर ब्राऊन राइस आणि हातसडीचा तांदूळ हे सर्वात फायदेशीर मानले जातात. तांदळावर जास्त प्रक्रिया केल्यामुळे त्यातील पोषक घटक आणि फायबर निघून जातात. ब्राऊन राइसवर प्रक्रिया कमी केलेली असते, त्यामुळे त्यातील 'कोंडा' आणि 'जर्म' हे भाग शाबूत राहतात. यामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते, जे पचनक्रिया सुधारण्यास आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यास मदत करते. तसेच, याचा 'ग्लायसेमिक इंडेक्स' पांढऱ्या तांदळाच्या तुलनेत कमी असल्याने रक्तातील साखर वेगाने वाढत नाही, परिणामी मधुमेही व्यक्तींसाठी हा एक चांगला पर्याय ठरतो.याशिवाय, भात पचायला हलका असतो, त्यामुळे पोटाच्या तक्रारी किंवा आजारपणात डॉक्टर भात खाण्याचा सल्ला देतात. भातामधील पोषक घटक पचनसंस्था सुरळीत ठेवण्यास मदत करतात. दुसऱ्या बाजूला, भातामध्ये कोलेस्टेरॉल, सोडियम आणि फॅट्सचे प्रमाण नगण्य असते, ज्यामुळे तो हृदयाच्या आरोग्यासाठी पोषक ठरतो. तांदळाच्या विविध प्रकारांपैकी 'ब्राऊन राइस' किंवा 'हातसडीचा तांदूळ' यामध्ये फायबर आणि जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात, जे वजन नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तातील साखर संतुलित राखण्यास मदत करतात. पांढऱ्या भातामध्ये देखील शरीरासाठी आवश्यक असलेली खनिजे आढळतात. योग्य प्रमाणात आणि योग्य वेळेत (विशेषतः दुपारच्या जेवणात) भाताचे सेवन केल्यास शरीराची चयापचय क्रिया सुधारते आणि त्वचा देखील निरोगी राहण्यास मदत होते. तांदूळ पाण्यात भिजवून ठेवल्याने त्यात असलेल्या फायटिक ॲसिडची पातळी कमी होते. हे फायटिक ॲसिड शरीराला लोह, कॅल्शियम आणि जस्त सारख्या आवश्यक खनिजे शोषून घेण्यापासून प्रतिबंधित करते. भिजवण्याने हा अडथळा काही प्रमाणात कमी होतो. हे शरीरास आवश्यक खनिजे सहजपणे शोषण्यास अनुमती देते. विशेषत: मुले, महिला आणि वृद्धांसाठी हे फायदेशीर आहे. त्याच्या फायद्यांमध्ये हाडांची शक्ती वाढणे आणि अशक्तपणापासून आराम करणे समाविष्ट आहे. याशिवाय भिजवलेला तांदूळ सहज पचतो. तांदूळ भिजवण्याने स्वयंपाक करण्याची प्रक्रिया देखील सुधारते. पाण्यात भिजवलेला तांदूळ थोडा लवकर मऊ होतो. यामुळे तांदूळ स्वयंपाक करताना समान प्रमाणात शिजण्यास अनुमती देते. तांदूळ मऊ आणि सहज विभक्त होतो, पोटाला चिकटत नाही. चवही चांगली होते. तांदूळ पाण्यात भिजवून ठेवल्याने त्यात असलेल्या फायटिक ॲसिडची पातळी कमी होते. हे फायटिक ॲसिड शरीराला लोह, कॅल्शियम आणि जस्त सारख्या आवश्यक खनिजे शोषून घेण्यापासून प्रतिबंधित करते. भिजवण्याने हा अडथळा काही प्रमाणात कमी होतो. हे शरीरास आवश्यक खनिजे सहजपणे शोषण्यास अनुमती देते. विशेषत: मुले, महिला आणि वृद्धांसाठी हे फायदेशीर आहे. त्याच्या फायद्यांमध्ये हाडांची शक्ती वाढणे आणि अशक्तपणापासून आराम करणे समाविष्ट आहे. याशिवाय भिजवलेला तांदूळ सहज पचतो. तांदूळ भिजवण्याने स्वयंपाक करण्याची प्रक्रिया देखील सुधारते. पाण्यात भिजवलेला तांदूळ थोडा लवकर मऊ होतो. यामुळे तांदूळ स्वयंपाक करताना समान प्रमाणात शिजण्यास अनुमती देते. तांदूळ मऊ आणि सहज विभक्त होतो, पोटाला चिकटत नाही.चवही चांगली होते.याव्यतिरिक्त, काळा तांदूळ आणि लाल तांदूळ हे देखील आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. काळ्या तांदळात 'अँथोसायनिन' नावाचे शक्तिशाली अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास आणि कर्करोगासारख्या आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात. लाल तांदळात लोह आणि मँगनीजचे प्रमाण जास्त असते, जे रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी आणि हाडांच्या मजबुतीसाठी फायदेशीर ठरते. जर तुम्हाला पांढरा भातच आवडत असेल, तर तो डाळीसोबत किंवा भरपूर भाज्या टाकून खावा, जेणेकरून त्यातील पोषक मूल्य वाढते. मात्र, वजन कमी करायचे असल्यास किंवा हृदयविकार टाळायचे असल्यास आहारात ब्राऊन राइस किंवा हातसडीच्या तांदळाला प्राधान्य देणे केव्हाही उत्तम ठरेल.भाताचे सेवन आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. तांदूळ हा कर्बोदकांचा उत्तम स्रोत असल्याने तो शरीराला तात्काळ ऊर्जा देण्याचे काम करतो, ज्यामुळे दिवसभराचा थकवा दूर होतो. भात नैसर्गिकरित्या पचायला हलका आणि 'ग्लूटेन-मुक्त' असतो, त्यामुळे लहान मुले, वृद्ध आणि पचनशक्ती कमकुवत असलेल्या व्यक्तींसाठी तो एक सुरक्षित आहार आहे. याशिवाय, भातामध्ये कोलेस्टेरॉल आणि सोडियमचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने तो हृदयविकार आणि उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. विशेषतः ब्राऊन राइसमध्ये असलेल्या फायबरमुळे वजन कमी करणे आणि रक्तातील साखर संतुलित राखणे सोपे जाते, जे संपूर्ण आरोग्यासाठी पोषक ठरते.

# अंत:करणात जिव्हाळा असल्याशिवाय लेखणीचा स्पर्श वाचकांच्या अंत:करणाला होणार नाही-संमेलनाध्यक्ष डॉ.वसंत आबाजी डहाके

## तिसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**

मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई अनुदानित,परिवर्तन प्रबोधिनी,द. इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स अमरावती व बिलीव्ह फाऊंडेशन अमरावती द्वारा आयोजित राज्यस्तरीय तिसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन शेगाव नाका अमरावती येथील अभियंता भवनमध्ये गोपाला गोपाला गाडगे बाबा गोपाला या गजरात अतिशय उत्साहात सुरु झाले. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक डॉ. वसंत आबाजी डहाके, स्वागताध्यक्ष जेष्ठ साहित्यिक, स्तंभलेखक तथा विचारवंत डॉ. श्यामसुंदर निकम, तर उदघाटक म्हणून जेष्ठ समाजसेवक सुदर्शनजी गांग विश्वस्त भारतीय जैन संघटना पुणे,डॉ. अविनाश आवलगावकर, मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर, डॉ. प्रभा गणोरकर, सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई, पूर्वाध्यक्ष डॉ. रा. गो. चवरे, डॉ. गजानन कोटेवार, इंजि. सुनील राठी, इंजि. राम विघे, परिवर्तन प्रबोधिनी अध्यक्ष शोभाताई रोकडे, सचिव रेखाताई बेलसरे, हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलतांना डॉ. वसंत आबाजी डहाके म्हणाले की,चळवळीतल्या साहित्यातून वेदना व्यक्त झाली आणि विद्रोहही व्यक्त झाला. आपल्या साहित्याचे प्रेम हे जसे मूल्य आहे तसेच विद्रोह हेही मूल्य आहे. पिढ्यान पिढ्या दडपलेल्या मनांनी विद्रोहाची भाषा उच्चारायची नाही तर काय करायचे? तुकाराम महाराजांनी देखील नाठाळाच्या माथ्यावर काठी हाणण्याची भाषा उच्चारली आहे. कवी स्वतःची दुःखे व्यक्त करत असतो तसेच त्याने जगाची दुःखे व्यक्त करावी. दुःखी पीडित सामान्य जनांविषयी अपार कळवळा असल्याशिवाय विद्रोह जन्माला येत नाही. पण तुकारामांना अभिप्रेत असलेला निर्मळ व निरागस धर्म आपल्या भूमीत रुजावा असे वाटत असेल तर मनात प्रेम असायलाच हवे. म्हणून लेखकांच्या अंत:करणात जिव्हाळा असल्याशिवाय त्यांच्या लिहिण्याचा स्पर्श वाचकांच्या अंत:करणाला होणार नाही.असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष डॉ. वसंत आबाजी डहाके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.साहित्याचा वारसा चालत राहावा यासाठीच साहित्य संमेलन वारंवार होत राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन स्वागताध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम यांनी व्यक्त केले तर मराठी भाषा ही सर्व संपन्न अशी भाषा असून अमरावतीच्या भूमीला लाभलेला हा वारसा टिकवून वृद्धिंगत करणे तितकेच गरजेचे असल्याचे मत उदघाटक मा. सुदर्शनजी गांग यांनी व्यक्त



केले.साहित्य चळवळी राबविणाऱ्यांमध्ये शोभाताईंचे कार्य खूप मोठे असून त्यासाठी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन नितीन पवित्रकार यांनी केले.तर जिल्ह्यातील साहित्यिकांना सातत्याने न्याय देऊन साहित्याच्या चळवळीत एकत्र बांधण्याचे कार्य परिवर्तन प्रबोधिनीच्या माध्यमातून नेहमीच होत असते. असे वक्तव्य परिवर्तन प्रबोधिनीच्या अध्यक्ष व संयोजक डॉ. शोभाताई रोकडे यांनी केले.भव्य अशा ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची यशस्वी सुरुवात झाली. त्यानंतर डॉ. पायल रोकडे यांचे स्वागत नृत्य झाले. डॉ. नयना दापूरकर यांच्या माय मराठी गीताने व्यासपीठावरील प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संमेलनाध्यक्ष डॉ. वसंत आबाजी डहाके यांचे हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपूजनाने संमेलनाची सुरुवात झाली. त्यानंतर अमरावती जिल्ह्यातील जेष्ठ साहित्यिक डॉ. सुभाष सावरकर, डॉ. रमेश अंधारे, मुक्ता केचे, डॉ. राज यावलीकर, रजनी राठी, प्रतिमा इंगोले, अनुराधा वऱ्हाडे, यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर कथालेखन व काव्यलेखन स्पर्धेतील पुरस्कार वितरण पार पडले.यानंतर महाराष्ट्रातील ख्यातनाम कवयित्री, स्त्रीवादी लेखिका मा. डॉ. संजीवनी तडेगावकर जालना यांची स्त्री साहित्यिकांना प्रेरणा देणारी डॉ. शोभा रोकडे यांनी घेतलेली प्रकट मुलाखत पार पडली. मराठी भाषेला अभिजात दर्जा व लेखकांपुढील आव्हाने या विषयांवरील परिसंवादातून डॉ. अलका गायकवाड, डॉ. राजेश मिरगे, डॉ. भगवान फाळके, माधव पांडे यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर झालेल्या निमंत्रितांच्या गझल मुशायऱ्याने व वऱ्हाडमाती वऱ्हाडी कविसंमेलनाने संमेलनात आणखीनचं रंगत भरली.पहिल्या दिवसातील शेवटच्या सत्रात सैनिकाच्या आईचा हृदयस्पर्शी एकपात्री प्रयोग शिवमती शोभना देशमुख यांनी सादर करून सर्वांना भावुक करून सोडले. दुसऱ्या दिवसाची सुरुवात बालसाहित्य संमेलनाने झाली.मंचावर उपस्थित सर्व बालकविंनी रसिकांची दाद मिळवली. कथाकथन या सत्रातील दिग्गज कथाकारांच्या कथांनी सभागृह भारावून गेले तर निमंत्रितांच्या दोन्ही कविसंमेलनांनी सभागृहात रंगत भरली.संमेलनाध्यक्ष डॉ. वसंत आबाजी डहाके,स्वागताध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम प्रभा गणोरकर, नरेशचंद्र काठोळे,प्रकाश बोके, हरिश मोहोड, प्रशांत विघे,डॉ. शोभा रोकडे, प्रा. रेखा बेलसरे आदि मान्यवरांच्या उपस्थितीत या दोन दिवसीय साहित्य संमेलनाचा समारोप झाला.संमेलनाला साहित्यिक व रसिकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

# विधी महाविद्यालयात माजी प्राचार्य डॉ.बी.एन.चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

येथील श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयात प्राचार्या डॉ.विना पाटील यांच्या मार्गदर्शना खाली महाविद्यालयाचे माजी प्राचार्य.डॉ.बी.एन.चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.डॉ.बी.एन.चव्हाण (वय ८४ वर्षे ) यांचे ता.२३ डिसेंबर रोजी दुखःद निधन झाले.डॉ.बी.एन. चव्हाण सरांच्या निधनामुळे नारायणराव चव्हाण महाविद्यालयाची मोठी हानी झाली असून सरांच्या कष्टाने व संपूर्ण



नियोजनाने महाविद्यालय महाराष्ट्रामध्ये नावारूपाला आलेले आहे.सरांचे महाविद्यालयाशी इतके जिव्हाळ्याचे आणि अतूट नाते होते की,बी.एन. चव्हाण सर म्हणजे नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय असे समीकरण प्रस्थापित झाले होते. त्यांनी महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले असून त्यांनी अनेक वर्षे महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून सुद्धा कार्य केले.त्यांची प्रशासकीय शिस्त व व्यवस्थापन हे खूपच महत्त्वाचे व अनुकरणीय होते. ते आज जरी आपल्यात नसले तरी विचाराने सोबत राहतील अशी भावना प्राचार्या डॉ.विना पाटील यांनी व्यक्त केली.यावेळी उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील डॉ.बी.एन.चव्हाण यांचा महत्त्वाचा सहभाग आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेत त्यांची सक्रिय भूमिका याबद्दलच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि असंख्य विद्यार्थी आदिंनी उपस्थित राहून कै.डॉ.बी.एन. चव्हाण सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# फ्लॅट विक्रीच्या वादातून इस्टेट एजंटची दहशत; मारहाण व खंडणीची धमकी;कोतवालीत इस्टेट एजंटवर गुन्हा

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरातील फ्लॅट विक्रीच्या व्यवहारातून वाद निर्माण होऊन इस्टेट एजंटकडून मारहाण, शिवीगाळ व खंडणीची धमकी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये २५ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इस्टेट एजंट इकराम नजीर तांबटकर (रा. घास गल्ली) याच्यावर गुन्हा दाखल झाला असून, फर्निचर व्यावसायिक यासर फिरोज तांबटकर यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.फिर्यादी यासर फिरोज तांबटकर यांचा फर्निचरचा व्यवसाय असून, ते आपल्या कुटुंबीयांसह शहरातील शहाजी रोड येथील एका इमारतीत फ्लॅट क्रमांक २०१ व २०२ मध्ये वास्तव्यास आहेत. हे दोन्ही फ्लॅट



विक्रीसाठी असल्याने ते संभाव्य ग्राहक पाहत होते. याच संदर्भात त्यांची ओळख इस्टेट एजंट इकराम नजीर तांबटकर याच्याशी होती. घटनेच्या दिवशी, २५ डिसेंबर रोजी यासर तांबटकर हे कापड बाजार परिसरातील लोकसेवा हॉटेलजवळ असताना इकराम तांबटकर तेथे आला. त्याने तुमच्या फ्लॅटसाठी मी ग्राहक शोधला आहे, असे सांगितले. मात्र, यासर तांबटकर यांनी तुमच्या सांगण्यावरून फ्लॅट कोणाला विकणे बंधनकारक नाही, असे स्पष्ट केले. यावरून दोघांमध्ये वाद झाला. इकराम तांबटकर याने मी ज्याला सांगेन त्यालाच फ्लॅट विकायचा आणि मला दोन लाख रुपये द्यायचे, नाहीतर मी फ्लॅट विकू देणार नाही, अशी धमकी दिली. यासर तांबटकर यांनी यास ठाम नकार दिल्याने आरोपीने हाताने मारहाण केली. तसेच दोन लाख रुपये दे, नाहीतर हातपाय तोडून टाकीन, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेदरम्यान यासर तांबटकर यांचा भाचा व त्यांचा एक मित्र यांनी मध्यस्थी त्यांची सुटका केली. मात्र आरोपी इकराम तांबटकर याने शिवीगाळ करत पुन्हा दोन लाख रुपये देण्याची धमकी दिली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व धमकावण्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# केडगावला माऊली प्रतिष्ठाण वारकरी सेवा संघाच्या पारायण सप्ताहास प्रारंभ

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

केडगाव मधील पाच गोडाऊन प्रगणात माऊली प्रतिष्ठाण वारकरी सेवा संघ द्वारा आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरी पारायणचे हे रोप्य महोत्सवी वर्ष असून गेल्या २५ वर्षांपूर्वी पासून ही परंपरा पुढे चालत आहे.या धार्मिक सप्ताहाचे उद्घाटनाप्रंगी माजी नगसेवक अमोल येवले, विजय पठारे, सुनिल कोतकर, गोवर्धन सुर्यवंशी, ह.भ.प. शिगोटे नाना, ह.भ.प बाळासाहेब बोरकड, ह.भ.प. स्वानंद जोशी, भीमा सातपुते, भागिनाथ कोतकर, भागवत सातपुते, विक्रम विरकर, अवधुत काळे, सुरज ठोंबरे, उदय जासुद, गोरख कार्ले, मयुर सूर्यवंशी, मयुर जाधव, तुषार बोरकद, नंदकिशोर सुर्यवंशी, दिलीप महाराज आदींसह भजनी मंडळी उपस्थित होते. अमोल येवले म्हणाले की, कलियुगात भाविकांना नामस्मरणाने ईश्वर प्राप्तीचा सुख मिळतो. धकाधकीच्या जीवनात भक्तीमार्गाने जीवनात सुख, समाधान निर्माण होत असतो. सुख, समाधान प्राप्तीसाठी धर्म मंडपाशिवाय पर्याय नाही. येथूनच परमार्थाचा खरा मार्ग सापडतो. अखंड हरिनाम सप्ताहाने भावी पिढीवर संस्कार रुजत असतात. भरकटलेल्या युवक-युवतींना दिशा देण्यासाठी वारकरी संप्रदायाच्या व्यासपीठाशिवाय पर्याय उरलेला नाही, सुभाष महाराज यांनी २५ वर्षांपूर्वी लावलेले छोटे वृक्ष आता मोठे झाले आहे. रौप्य महोत्सव साजरा होत असताना, केडगावमध्ये ही परंपरा अखंड सुरु राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.विजय पठारे म्हणले की, वारकरी संप्रदायामुळे समाजात संस्कृती व संस्कार टिकला आहे. समाजप्रबोधनाने समाजाला दिशा दिली जात आहे. जीवनाला भक्तीमार्ग दाखविण्यासाठी युवकांना अखंड हरिनाम सप्ताह दिशादर्शक ठरत आहे. धार्मिकतेला समाजसेवेची जोड मिळाल्यास समाजाचा विकास साधला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. ह.भ.प. शिगोटे नाना म्हणाले की, या कार्याची मुहूर्तमेढ ब्रह्मलीन सुभाष महाराज सूर्यवंशी यांनी रोवली. ग्रामीण भागात परमार्थ सहज रुजतो, मात्र शहरी भागात तो रुजवण्यासाठी त्यांनी मोलाचे प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून केडगावमध्ये वारकरी संघाची स्थापना झाली. हा सप्ताह महाराष्ट्रात नामांकित व्हावा, अशी त्यांची इच्छा होती, या स्वप्नपूर्तीच्या दिशेने कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. या धार्मिक सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, अमोल येवले व विजय पठारे याचे सहकार्य लाभले.



# करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांचे वितरण

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

समाजातील कुरुपता दूर करण्याचे काम साहित्य करते. राजकारणाने समाज कलुषित झाला आहे. छत्रपती चौथे शिवाजी महाराज या क्रांतिकारी राजाचे आदर्श समोर ठेऊन साहित्यिकांना जबाबदारीने समाजाला पुढे घेऊन जावे लागणार आहे. साहित्यिक घाबरतील, तेव्हा सक्षम भारत उभा राहू शकणार नाही. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व हे संविधानाने प्राप्त झाले असून, संविधानाच्या विरोधात वाटचाल असेल तेव्हा शोषित समाजाकडे पडलेले पाऊल असणार असल्याचे प्रतिपादन ९९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांनी केले.हुतात्मा छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या १४२ व्या हौतात्म्य (स्मृति) दिनाचे अवचित्य साधून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार यांच्या वतीने गुरुवारी (दि. २५ डिसेंबर) अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. तसेच छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या नावे मानाचे राज्य साहित्य पुरस्कार प्रदान कार्यक्रम सोहळा उत्साहात पार पडला. न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज मधील राजर्षी शाहू महाराज सभागृहात झालेल्या कार्यक्रमात प्रेमानंद गज्वी बोलत होते. यावेळी भांडाराचे सभापती व संस्थेचे सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सहसचिव मुकेश (दादा) मुळे, खजिनदार ॲड दीपलक्ष्मी म्हसे, सदस्य, दीपक दरे, अरुणाताई काळे, निर्मलाताई काटे, कल्पनाताई वायकर, भंडाराचे चेअरमन प्रा. रवींद्र देवढे, व्हा चेअरमन सुरेश घुंगाडे, न्यू आर्टस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, प्राचार्य विजयकुमार पोकळे, भांडाराचे पदाधिकारी, संचालक व पुरस्कार निवड समिती सदस्य प्रा. मेधाताई काळे, न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, प्रा. डॉ. बापू चंदनशिवे, प्राचार्य डॉ. रामदास टेकाळे, प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, राज्य साहित्य पुरस्कार समितीचे कार्यकारी समन्वयक प्रा. गणेश भगत व संस्थेत कार्यरत प्राध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे गज्वी म्हणाले की, सत्यासाठी काही किंमत मोजावी लागली तरी साहित्यिक व कलाकारांनी मागे हटू नये. कला कोणाची बटिक नसते, बटीक असलेली कला नसते, चांगले साहित्याला आपोआप समाज मान्यता व पुरस्कार मिळते. कलेसाठी जीवन, की जीवनासाठी कला! असे नसून ज्ञानासाठी कला असली पाहिजे. या तिसऱ्या चौकटीकडे साहित्यिकांना प्रवास करावा लागणार आहे. सत्य समोर आणणे हे लेखकाची नैतिक जबाबदारी असते, ते विसरु नये. सामाजिक प्रश्नांना जागरूक राहिले पाहिजे. ठेच लागली, वेदना झाल्या तर साहित्य निर्मिती होते. तसेच लेखकांनी इतरांच्या वेदनांशी समरूप होऊन देखील साहित्य निर्मिती करावी. जात सोडून आधुनिकतेकडे वाटचाल करावी माणसांनी माणूस म्हणून माणसांचे दुःख पहाण्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते हुतात्मा स्मारक येथील




छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या समाधी स्थळावर व त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून समाधीस्थळावर अभिवादन करण्यात आले. संस्था गीत व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.प्रास्ताविकात सचिव व सभापती विश्वासराव आठरे यांनी केले. चौथे शिवाजी महाराज यांच्या जीवनातील इतिहासाचा आढावा घेतला. त्यांचा कारभार, विकासात्मक उभारणी व हुतात्मा झाल्याचा इतिहास स्पष्ट केला. राज्यातील साहित्यिकांची मोट बांधण्याच्या उद्देशाने हा सोहळा दरवर्षी घेण्यात येतो. साहित्य संस्कृती वाढावी, वैचारिक वारसातून समाज समृद्ध व्हावा व साहित्य चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी हा पुरस्कार सोहळा दरवर्षी होत असून, हे सातवे वर्ष असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संस्थेचे ग्रंथालय समृद्ध होण्यासाठी पुस्तकांची खरेदी करून ग्रंथालय संपन्न करण्यात आल्याचे स्पष्ट केले. पुरस्कारार्थींच्या सन्मानपत्राचे वाचन कार्यकारी समन्वयक प्रा. गणेश भगत यांनी केले.परीक्षकांच्या वतीने भावना व्यक्त करताना प्राचार्य डॉ.एम.एम. तांबे म्हणाले की, पुरोगामी विचार पुढे घेऊन जाणाऱ्या साहित्यिकांना पुरस्कार दिला जातो. काल्पनिक साहित्यांना या पुरस्कारासाठी ग्राह्य धरले जात नाही. १८० प्रकारच्या साहित्यकृतीतून पुरस्कार निवडण्यात आले. त्यासाठी तब्बल सहा महिन्याचा कालावधी लागला व साहित्यकृतींना पुरस्कार देताना त्या मागील उद्देश त्यांनी स्पष्ट केला.

या कार्यक्रमात पुरस्कारार्थींनी या पुरस्कार सोहळ्याने भारावलो असल्याचे सांगितले. तर आपल्या साहित्यकृतीच्या निर्मिती मागचा उद्देश स्पष्ट केला व स्वत:च्या व समाजातील जगण्याचे वास्तव लिखाणातून मांडल्याचे विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ विवेक भापकर यांनी वाचन संस्कृती रुजवण्यासाठी व साहित्य चळवळ समृद्ध करण्याचा उद्दिष्ट स्पष्ट केला. त्यासाठी हा पुरस्कार सोहळा असून, राज्यातील साहित्यिकांना एकत्र आणले जात असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय आखाडे यांनी केले. आभार भांडारचे चेअरमन प्रा.रवींद्र देवढे यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार २०२५ प्राप्त पुढील प्रमाणे–**

सातारा येथील विद्या पोळ- जगताप यांच्या बाय गं ( कादंबरी), बीड येथील दत्ता बारगजे यांच्या फकिरी ( आत्मचरित्र), ठाणे येथील डॉ. संजय दिगंबर जोशी यांच्या कथा जैवविविधतेची (लेख संग्रह), अकोले येथील प्रा. डॉ. रंजना मधुकर कदम यांच्या विचारवेध (वैचारिक), नाशिक येथील किरण भावसार यांच्या घामाचे संदर्भ (कवीता संग्रह), ठाणे येथील विद्या विनायक निकम यांच्या अस्वस्थ मनाचे पडघम (ललित ग्रंथ) या साहित्यकृतींना राज्य साहित्य पुरस्कार देण्यात येत आहे. तसेच अमरावती येथील ड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे यांच्या छोट्या छोट्या गोष्टी जगण्याची देते दृष्टी (बालसाहित्य) या साहित्यकृतीला विशेष राज्य साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. त्याचबरोबर जिल्हास्तरावरील साहित्य पुरस्कार प्रा. भानुदास रतन बेरड यांच्या गंध मातीचा (ललित ग्रंथ) या ग्रंथास जाहीर केला आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र, १० हजार रोख रक्कम, शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ पुरस्काराचे स्वरुप होते.

# लोहा बाजार समितीची मुख्य इमारत, मार्केट यार्ड प्रशस्त बनवणार: आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर

## आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात लोहा कंधार तालुक्यातील जि.प.पंचायत समितीच्या सर्व जागा निवडून येणार; सभापती विक्रांत पाटील शिंदे

दैनिक वादळ वार्ता
**लोहा | प्रतिनिधी**

जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात लोहा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाने नगराध्यक्ष पदासह १७ नगरसेवक बहुमताने विजयी झाल्याबद्दल लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार व १७ विजयी नवनियुक्त नगरसेवकांचा शाल, पुष्पहार व फटाक्यांची भव्य अतिशबाजी करत बाजार समितीचे सभापती विक्रांत पाटील शिंदे व सर्व संचालक मंडळाच्या वतीने शहरातील गणपती मंदिर येथे भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर नांदेड, दक्षिणचे माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत पाटील शिंदे ,लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार, बाजार समितीचे उपसभापती अण्णासाहेब पाटील पवार, सुनील



शेठ पेनुरकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष छत्रपती स्वामी महाराज श्याम अण्णा पवार, माळाकोळीचे सरपंच मोहन काका शूर, सिद्धू वडजे,सह बाजार समितीचे सचिव आनंद घोरबांड सह सर्व नवनियुक्त नगराध्यक्ष व १७ नगरसेवक व बाजार समितीचे संचालक मंडळ उपस्थित होते, यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना बाजार समितीचे सभापती विक्रांत पाटील शिंदे म्हणाले की, नांदेड जिल्ह्याचे खंबीर नेतृत्व लोहा कंधारचे भाग्यविधाते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वात लोहा नगरपरिषदे सह नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वात नांदेड जिल्ह्यात एक नंबरचा पक्ष ठरला असल्याने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे आभार मानून त्यांना शुभेच्छा दिल्या व लोहा कंधार मधील जिल्हा परिषदेच्या बाराच्या बारा जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहील व पंचायत समिती मध्ये ही बहुमत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात सिद्ध होणार आहे ,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्वच्छते सह अनेक समस्या असून त्या समस्या मिटवण्यासाठी आमदार चिखलीकर साहेब सदैव कटिबद्ध असून मार्केट कमिटीच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून द्यावा आम्ही आमदार चिखलीकर यांच्यासोबत सदैव ठामपणे उभे राहणार असल्याचे सभापती विक्रांत पाटील शिंदे म्हणाले , अध्यक्षीय भाषणाचा समारोप करताना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की लोहा बाजार समितीला अनेक समस्या आहेत त्यात स्वच्छतेचा मोठा प्रश्न आहे, आम्ही नगरपरिषदेला कर देतो पण स्वच्छता होत नाही असे सभापती विक्रांत शिंदे म्हणाले पण मी एक शब्द देतो की आम्ही ज्या दिवशी नगर परिषदेच्या खुर्चीवर बसू त्या दिवसापासून लोहा शहरातील सर्व भागातील दैनंदिन स्वच्छता ,अंडरग्राउंड, वॉटर सप्लाय, अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन, स्वच्छ पाणीपुरवठा, दिवाबत्ती ,रस्ते ,नाली आणि डिव्हायडर मध्ये झाडे लावून जगविने व रस्त्यावरील स्ट्रीट लाईट विनानिलंब चालू करणे आणि घरकुल लाभार्थ्यांना विना विलंब त्यांच्या खात्यावर पैसे टाकले जातील यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, लोहा शहर स्वच्छ शहर, सुंदर शहर, हरित शहर होण्यासाठी आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील, शहरातील हमाल ,मापारी, व्यापारी ,शेतकरी बांधव सर्वसामान्य नागरिकांची विकास कामे प्राधान्याने होतील आम्ही जात धर्म पंथ बघत नसून आम्ही माणुसकी हीच जात आहे हे जपत असतो, लोहा बाजार समितीचे सभापती व संचालक तरुण व काम करणारी तरुण टीम असल्याने लोहा बाजार समितीचे सभापती विक्रांत यांच्या नेतृत्वात लोहा बाजार समितीची मुख्य इमारत व मार्केट यार्ड व लोहा बाजार समितीचा सर्वांगीण विकास बाजार समितीचे सभापती विक्रांतच्या माध्यमातून करायचा आहे यासाठी कोणीही शंका घेऊ नये, हा विकास करण्यासाठी वाटेल तितका निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही यावेळी बोलताना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली, यावेळी बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ लोहा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक उपस्थित होते.

# महिला व शुद्रांना गुलाम बनविणारी मनुस्मृति वारंवार जाळली पाहिजे-अनितिताताई रोडे

दैनिक वादळ वार्ता
**परळी | प्रतिनिधी**

महिला व शुद्र,अतिशुद्रांना गुलाम बनविणारी मनुस्मृति वारंवार जाळली पाहिजे असे प्रतिपादन अनिताताई रोडे यांनी केले.मनुस्मृती दहन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.माणसा माणसात भेद निर्माण करणारा आणि विषम समाज व्यवस्थेची पायाभरणी करणारा मनुस्मृति ग्रंथ महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे जाळला होता. हा दिवस परळी येथे महिलांच्या हस्ते मनुस्मृती जाळून साजरा करण्यात आला.

परळी शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील प्रांगणात काल रात्री मनुस्मृती दहन दिनानिमित्त



कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते भास्कर नाना रोडे होते.प्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास महिलांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.त्यानंतर सामुहिक त्रिशरण, पंचशीला ग्रहण करण्यात आली. तसेच याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच परळी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रानबा गायकवाड व कार्याध्यक्ष पदी संपादक नितीन ढाकणे यांची निवड झाल्याबद्दल सम्राट अशोक विचार मंच यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.फुले -आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे म्हणाले की, संवैधानिक नैतिकता व संवैधानिक मूल्यांची मशागत ही निरंतर उपक्रमातून निर्माण होणारी प्रक्रिया आहे , जातीग्रस्त भेदभावातून समताधिष्ठ व मानवी चेतना व बुद्धीचे या उद्देशासाठी सार्वजनिक मनुस्मृती दहन निरंतर व वारंवार या कार्यक्रमास प्रा विलास रोडे,अशोक वाघमारे, गंगाधर रोडे, चिंतामणी खंडागळे, वैजनाथ जगतकर, मिलिंद घाडगे, सुनील कांबळे, नवनाथ दाणे, सिद्धार्थ जगतकर,सोपान निलेवाड सर, वसंत बनसोडे, .मिलिंद बनसोडे, मुक्ताराम गवळी, विजयकुमार गोदाम, राजेश सरवदे,भीमशाहीर सुर्यवंशी,अनिता रोडे, सुनंदा किवन्दे, द्वारका रोडे आदी महिला, पुरुष उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक भगवान साकसमुद्रे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.दासू वाघमारे यांनी केले.

# मिठ्याफळी व मक्राणीफळी येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी | प्रतिनिधी**

अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांच्या शुभ हस्ते व माजी समाज कल्याण सभापती शंकर पाडवी यांच्या प्रमुख उपस्थितीत मिठ्याफळी व मक्राणीफळी येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

विविध विकास कामात मिठ्याफळी येथे मस्जिदच्या मागे पाईप मोरी, मक्राणीफळी मस्जिद पासुन ते हॉटेल फ्रेंड पर्यंत गटारीचे बांधकाम करणे, करीम लाला यांच्या घरापासून ते युसुफ मुर्गी वाले यांच्या घरापर्यंत गटार बांधकाम करणे, अक्कलकुवा जवाई नगर येथे पाच गटारीचे बांधकाम करणे, मक्राणीफळी येथे दिनेश रामजी यांच्या घराजवळ पाईप मोरीचे बांधकाम करणे आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी अक्कलकुवा गृप ग्रामपंचायतीच्या सरपंच उषाताई बोरा, उप सरपंच इम्रान मक्राणी, रावेंद्र चंदेल, गुलाम कादर बलोच, रोहित चौधरी, प्रकाश खिची, प्रा दिनेश खरात, बापु महिरे, जगदीश पवार, अमरसिंग वळवी, दिलीप पाडवी, विनित



पाडवी, भावेश पाडवी, हरिश्चंद्र तडवी, संगीता पाडवी, मथुराताई पाडवी, निता माळी, इम्रान पठाण, धिजू पाडवी, कुलदिप टाक, रविंद्र पाडवी, शाकीब पठाण, बाबा कुरेशी, आमदार आमश्या पाडवी यांचे स्विय सहाय्यक रविंद्र गुरव, सुधीरकुमार ब्राम्हणे, भिकमचंद चव्हाण, हुजेफा बलोच, अविनाश बि-हाडे, आसिफ मक्राणी, करीम लाला मक्राणी, हाजी मेहमूद, शोएब कादर, जावीद सरदार बलोच, अब्दुल्ला मक्राणी, आसिफ ड्रायव्हर, आदी पदाधिकारी, शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नंदुरबार जिल्ह्यात आर्थिक योजनांना मिळणार वेग

## प्रलंबित कर्ज प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

जिल्ह्यातील शेतकरी, पशुपालक आणि नवउद्योजकांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन आता आक्रमक झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय बँकर्स समन्वय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी बँकांना प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

या बैठकीत प्रामुख्याने किसान क्रेडिट कार्ड , मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन विभागातील अर्जांचा आढावा घेण्यात आला. पी एम ई जी पी आणि सी एम इ जी पी सारख्या महत्त्वपूर्ण स्वयंरोजगार योजनांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तालुकास्तरावर विशेष कॅम्प आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बँकिंग सेवा सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी बँकांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केले. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे आणि विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो लाभार्थींना दिलासा मिळणार असून, प्रलंबित कामांना आता 'रॉकेट गती' मिळण्याची चिन्हे आहेत. आरबीआय आणि नाबार्डच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीमुळे या नियोजनाला तांत्रिक पाठबळही लाभले आहे.

# लोह्यात दि.७ जानेवारी रोजी श्रामणेर शिबीराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा | प्रतिनिधी**

लोहा शहरात दि. ७ जानेवारी २०२६ रोजी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने श्रामणेर शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भारतीय बौद्ध महासभा शाखा लोहा तालुका यांच्या वतीने देण्यात आली आहे.

पुढे भारतीय बौद्ध महासभा शाखा लोहा च्या वतीने असे नमूद केले की,

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा लोहा च्या वतीने असे आवाहन करण्यात येते की,

श्रद्धावान शील संपन्न सर्व बौद्ध बांधवांना कळविण्यात आनंद होतो की आपल्या सर्वांच अपेक्षा नुसार भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा लोहा जिल्हा नांदेड या संस्थेमार्फत तालुका लोहा येथे श्रामणेर बौद्धाचार्य शिबिर घेण्याचा निर्णय



झाला आहे

दिनांक ७ जानेवारी २०२६ बुधवार ते १६ जानेवारी २०२६ शुक्रवार पर्यंत १० दिवसाच्या कालावधीत श्रामणेर बौद्धाचार्य शिबिर लोहा शहरातील क्रांतीसुर्य बौद्ध विहार येथे होणार आहे .

ज्यांना ज्यांना श्रामणेर बौद्धाचार्य शिबिरात भाग घ्यायचा आहे त्यांनी तालुका शाखा लोहा या संस्थेकडे नाव नोंदणी करावी शिबिरात ची फीस भरून पावती घ्यावी

श्रामणेर बौद्धाचार्य शिबिरात भाग घेणाऱ्या शिबिरार्थीसाठी एकूण फीस ५०० अशी आकारण्यात आली आहे त्यासाठी आपली नोंद तालुका शाखेकडे करावी

श्रामणेर संघास भोजनदान देणाऱ्या ग्रामस्थांनी उपासक-उपासिकांनी आपापल्या गावाची नावे तालुका शाखेकडे नोंदवावी तसेच वैयक्तिकरित्या सकाळचा नाष्टा फराळ व रात्रीचा फलहार कोणत्याही एक वेळचा चहा देणाऱ्या उपासक उपाशीकांनी आपली नावे तालुका शाखेकडे नोंदवावी

शिबिर यशस्वीरित्यापणे पार पाडण्यासाठी सर्व बांधवांनी जास्तीत जास्त धम्मदान द्यावे व या दहा दिवसाच्या काळामध्ये होणाऱ्या धम्म प्रवचनास उपस्थित राहावे आणि पुण्य कर्म करावे आपल्या सर्वांच्या सहकार्यातून श्रामणेर शिबिर संपन्न होणार आहे

आपण खालील पदाधिकाऱ्याची संपर्क साधावा

आयु. बापूसाहेब माधवराव कापुरे तालुका अध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षक ८१४९७००३५८

आयु .धोंडिबा बळीराम यानभुरे तालुका सरचिटणीस तथा केंद्रीय शिक्षक ९०९६१३९२५४

यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा शाखा लोहा च्या वतीने करण्यात आले आहे.

# यु.ई.एस.ज्युनिअर कॉलेजने रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ मध्ये प्रथम क्रमांक पटकावला तर निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळविले

दैनिक वादळ वार्ता
**उरण | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग - अलिबाग तर्फे दिनांक २३-१२-२०२५ ते २४-१२-२०२५ ह्या कालावधी मध्ये सेंट विल्फ्रेड स्कूल, शेडुंग, पनवेल येथे रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ आयोजन केले होते. ह्या प्रदर्शनामध्ये एकूण ४५ शाळा व कॉलेजने सहभाग घेतला होता. ज्यात यु. ई. एस. ज्युनिअर कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला तर निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळविले. तसेच आता हा यु. ई. एस. चा प्रकल्प, राज्यस्तरीय विज्ञान प्रकल्पासाठी पात्र ठरला आहे. विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी एसटीइएम ह्या विषयावर ज्यु. कॉलेजच्या एकूण १५ विद्यार्थ्यांनी प्रकल्प तयार करुन प्रदर्शनात सहभाग घेतला होता. ज्यास एकूण ४५ शाळा व कॉलेजमधून प्रथम क्रमांक मिळाला तर कु. भार्गवी मंदार जाधव हिस निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. ह्या प्रकल्पासाठी मार्गदर्शन करणारे ज्यु. कॉलेजचे प्रतिक प्रशांत पाटील व कु. केतकी चंद्रविलास ठाकूर ह्यांचे व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे यु .ई. एस. संस्थेचे कमिटी मेंबर्स व स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या व समन्वयक, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका ह्यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. व आता थोड्याच दिवसांनी होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातही यु. ई. एस. चे विद्यार्थी व शिक्षक घवघवीत यश मिळवून कौतुकास पात्र ठरतील, ह्यात तिळमात्रही शंका नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077